# मला काही सांगायचंय !



संवादिनी फाउन्डेशनतर्फे होणाऱ्या पंडित चिमोटे यांच्या सत्काराचे निमंत्रण जेव्हां मला दिलं तेव्हां ते वाचल्यावर मी थोडावेळ अंतर्मुख झाले व खूप जुन्या आठवणी हळूहळू मनातल्या मनात रुंजी घालू लागल्या.

माझ्या वडिलांना अभिजात संगीताची अत्यंत आवड होती व उत्तम जाण होती. त्यांनी चावी देऊन वाजणारा ग्रामोफोन घेतला होता व कोलंबस व एच. एम. व्ही. च्या उ. अब्दुल करीम खाँ, उ. फैयाज़ खाँ, उ. बडे गुलाम अलीखाँ, ओकारनाथ ठाकूर, पं. पलुस्कर, केसरबाई केरकर, इ. च्या अनेक रेकॉर्डस आणल्या होत्या. 'मूड लागेल तेव्हां ते ऐकते. आम्हा भावंडांच्याहि संगीत सतत कानावर पडत असे. दर शनिवारी रात्री रसिक मित्रांना घरी बोलावून त्यांच्या समवेत रेकॉर्ड्स ऐकवून आनंद लुटत असत. बोरीवलीला रहाणारे कलाकार बाबूराव कुलकर्णी (उत्तम सतार वादक) त्यांचे भाऊ मल्हारी कुळकर्णी (उत्तम तबला व फ्ल्यूट वादक) शंभूभाई फडके, पंडित शिवराम (उत्तम गायक), माझे गुरु आंबेरकर मास्तर आणि मनोहर चिमोटे असे उत्तम उत्तम कलाकारांच्या मैफली आमच्या घरी होत असत. आमचं घर तसं लहान होतं. सुरवातीला उत्साहाने आम्ही बसून ऐकत असू आणि ऐकता ऐकता तिथेच झोपेच्या आधीन होत असू. पण अजाणता माझ्या मनावर अशाप्रकारे सुरेल संगीताले संस्कार झाले.

मधे बराच काळ लोटला. माझं गाण्याचं शिक्षण सुरु झालं. थोडी थोडी गाण्याची समज येऊ लागली. राग म्हणजे काय? गायकी म्हणजे काय? बंदिश, विलंबित द्रुत वगैरे शब्द कानावर पडूं लागले. प्रत्येक वाद्याच्या मर्यादेप्रमाणे वाजवण्याच्या पद्धती असतात. हे कळू लागलं. आपल्या मित्रांशी गप्पा मारताना वडील नेहमी म्हणायचे, ''कमाल आहे या चिमोट्यांची! किती सुंदर वाजवतात. जणू वाजवत, नाहीत, तर गात आहेत असं वाटतं असं गायकी अंगाने वाजवणारे मी पहिल्यांदाच पाहतोय.''

हे ऐकल्यावर मी त्यांच्या वादनाकडे बारकाईने पाहू लागले. योगा योगाने एकाच कार्यक्रमात मला पंडित चिमोट्यांची व त्यांच्या गुरुंची पं. भीष्मदेव वेदी यांची अवर्णनीय वादन ऐकण्याची उत्तम संधी मिळाली. तेव्हां त्यांची गुरुभक्ती पाहिली. होर्मोनियम या वादग्रस्त वाद्यावर जीवतोड मेहनत, रियाज करुन गायकी अंगाने वादन करुंन त्या वाद्याच्या क्षमता जास्त विस्तृत करून दाखवल्या. हा खरा कलाकार आर्थिक परिस्थिती बिकट असून पैसे कमावण्याचं साधन म्हणून त्यांनी कधी वादन केलं

नाही, गाणाऱ्यांची साथ संगत केली नाही.

स्वतंत्र हार्मोनियम् वादक म्हणून त्यांना मान्यता मिळावी या विचाराने ते झपाटलेले होते. त्यात भरीस भर म्हणजे आकाशवाणी वरुन हार्मोनियम या वाद्यावर बंदी आली होती. इतक्या प्रतिकूल परिस्थतीतसुद्धा त्यांनी आपल्या कलेवरची निष्ठा डळमळीत होऊ दिली नाही. माझे वडिल नेहमी त्यांच्या ह्या गुणांचं कौतुक करत. मला नेहमी म्हणत. ''बघ बाबी, अशी चिकाटी, जिद्द, प्रचंड मेहनत, शिवाय इस्थेटिक सेन्स असला तरच चांगला कलाकार तयार होतो.'' हे वाक्य मी मनात अगदी कोरुन ठेवलं. कारण मी गाणं शिकत होते खरी! पण इतकं मनावर घेतलं नव्हतं.

आज मी विचार करते तेव्हा मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की मला संगीताच्या इतिहासातील थोर कलाकारांच्या चरित्र लेखांच्या वाचनाने त्यावेळी स्फूर्ती तर मिळालीच पण नकळत जितजागत उदाहरण पंडितजीचं माझ्या भोवती होतं त्यामुळेही मला खूप प्रेरणा मिळाली व मला एक गायिका म्हणून मान्यता प्राप्त झाली असं मला वाटतं आणि म्हणून पंडितजींना माझे शतशः नमस्कार.

**- शुभा जोशी**

## हार्दिक शुभेच्छा !



## श्री. किशोर पेंढारकर
## सौ. मृणाल पेंढारकर
# गोरेगांव